भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र.२१२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/०३/२०१७

१) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २३/०३/२०१७ चे ०८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी हे मंदीराचे सचीव असुन मंदीराची सफाई करित असता व फिर्यादीची पत्नी व मुलगा स्वंयपाका बाबत बोलत होते यातील आरोपी हीने मलाच बोलत आहेस असे आपल्यावर घेवुन फिर्यादीच्या घरासमोर रोडवर येवुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करून दि. २८/०३/२०१७ ला दुर्गा स्थापनेच्या वेळी लोकांसमोर तुझी मानहानी करीन अशी धमकी दिल्याने फिर्यादी अशोक बाबुराव भरणे वय ४७ वर्ष रा.बाम्पेवाडा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ.गोडंगे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

२) मोटार सायकल निष्काळजीपणे चालवुन धडक दिल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २३/०३/२०१७ चे ११.३० वा. दरम्यान यातील फिर्यादीचा भाऊ जखमी अरूण दयाराम शिंदे वय ४० वर्ष रा. रा. लोहारा हा आपले मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम ४८४२ ने लोहारा वरून अर्जनी येथे जात असता यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने,निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे भावाचे मो.सा. ला धडक मारून जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी अर्जुन दयाराम शिंदे वय ३६ वर्ष रा.लोहारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४,१३४,/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. सार्वे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

३) प्रकृती बिघडल्याने उपचारा दरम्यान मृत्यु . :–

दिनांक ०५/०३/२०१७ चे १८.०० वा. ते दि. १५.०३.१७ चे २०.३० वा दरम्यान यातील मृतक राजेंद्र धोंडु अतकरी वय ४६ वर्ष, रा. खैरी सालेबर्डी ने आपले राहते घरी उलटया व संडास होउन प्रकृती खराब झाल्याने त्यास औषधोपचाराकरिता डॉ. तिरपुडे खैरी यांचे कडे उपचार करून घरी नेले व नंतर डॉ. चव्हान भंडारा यांचे कडे उपचार केला असता डॉ. चव्हान भंडारा यांनी रेफर केल्याने मृतकची पत्नी सौ. कल्पना अतकरी हीने त्यास मेडीकल कॉलेज नागपुर येथे वार्ड क्र. २४,बेड क्र.१३ तीकीट नं. १५३०८०२ वर दि. ०८/०३/२०१७ चे १०/४५ वा. वा. दर. भरती केले असता उपचारा दरम्यान दि. १५.०३.२०१७ चे २०.३० वा. डॉ ने मृत तपासुन मृत घोषीत केल्याने डॉ. मेमो वरून पोस्टे. अंजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. सोडगीर यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे जवाहरनगर येथे कलम १७४ जाफौ. चा नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. शेंडे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहे.

४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :-

दिनांक २३/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ६६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२, तीन सिटर वाहनांवरती ०५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५९ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

५) अवैध दारु अडयांवर धाडी . :-

दिनांक २३/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे.गोबरवाही,साकोली,लाखणी,अडयाळ येथे अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २० लिटर हा.भ. दारू किंमती १५००/—रु. तसेच ४ लीटर ६८० मीली लीटर देशी दारू किंमती १६५०/—रु. असा एकुण किंमती ३,१५०/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

पोउपनि.ए.व्ही. तुळजेवार
नियंत्रण कक्ष अधिकारी भंडारा
दुरध्वनी.क्र. ७७६८८६९९७७

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.